# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 21/04/2018 रोजी (का.क्र.प.26) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

शनिवार दिनांक 21 एप्रिल 2018 रोजी (का.प.क्र.26) मा.सभापती श्री.गजानन रामकिसन बारवाल यांचे अध्यक्षतेखाली महाागरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 3.45 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.अति.आयुक्त श्री.श्रीकृष्ण भालसिंग नगरसचिव श्री.डी डी सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य
02. स.स.श्री.सिताराम इसराम सुरे
03. स.स.श्री.अजिम अहेमद रफिक
04. स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
05. स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले
06. स.स.श्रीमती मनिषा बालाजी मुंडे
07. स.स.श्रीमती शेख नरगीस सलिम
08. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे

मा.सभापती : आजच्या सभेला बरेच अधिकारी उपस्थित नाही, नोंद घ्यावी.

श्रीमती संगिता वाघुले : पिसादेवी रस्त्याचे पॅचवर्कचे काम करण्यात आले प्रशासनाने संबधीत अधिकारी यांचे त्या वार्डाचे सदस्य म्हणून मी अभिनंदन करते.

श्रीमती किर्ती शिंदे : माझे वार्डात सफाई कर्मचारी कमी आहे.

अति.आयुक्त : वार्ड अधिकारी यांना एकूण 215 सफाई कर्मचारी दिलेले आहे आता यापूढे कर्मचारी पाहिजे असेल तर तसे अधिकार वार्ड अधिकारी यांना दिले आहे.

मा.सभापती : प्रशासनाने याची दखल घ्यावी व आवश्यक कर्मचारी दयावे.

श्रीमती मनीषा मुंढे : सातारा देवळाई परीसरात डेग्युचे रूग्ण आढळले. पिण्याचे पाणी सहा दिवसा आड येते. वार्डात फवारणी होत नाही अनेक भागात ड्रेनेज पाणी साचलेले असते.याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

श्रीमती संगिता वाघुले : वार्डात एक-एक महिणा फवारणी होत नाही.

स्व.निरीक्षक : प्रत्येक वार्डात आठवडयातून एक वेळेस फवारणी करतो.

श्री.सयद मतीन : अनेक वेळ या विषयावर चर्चा झाली दखल घेतली जात नाही जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करण्याची वेळ आली आहे.

श्री.सिताराम सुरे : अनेक वार्डात फवारणी होत नाही माझे वार्डात तीन महिण्यापासून फवारणी नाही.जेथे गरज आहे तेथेच औषध फवारणी करावी. वाजवी खर्च होऊ नये बोगस बील त्या एजन्सीचे काढू नये.

श्रीमती स्वाती नागरे : वार्डात कचरा साचला त्यावर फवारणी होत नाही. केंव्हा फवारणी होते कोण फवारणी करतात माहिती घ्यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :कोणकोणत्या वार्डात केंव्हा फवारणी होते. माझे वार्डात 3-4 महिण्यात फवारणी झाली नाही.

मा.सभापती : सदस्यांनी सुचना केल्या त्याची दखल घ्यावी. वेळेवर फवारणी करण्यात यावी.

श्री.सिताराम सुरे : 26 तारखेला बजेट सादर केले होते ते अंतिम केले की नाही.

मा.सभापती : बजेट दुरूस्तीसह सर्वसाधारण सभेकडे 26 तारखेला सादर करणार आहे.

श्री.अजीम अहेमद : श्री.पाटणी हे फोन उचलत नाही. अनेक संचिका प्रलंबीत आहे मंजूरी होत नाही.

| | |
|---|---|
| मा.सभापती | : अनेक अधिकारी कचरा समस्या संदर्भात कामासाठी गुंतलेले आहे. मा.कोर्टाच्या कचरा विल्हेवाट संदर्भात सक्त सुचना आहे त्यानुसार कचरा कोंडी सोडविणे आवश्यक आहे. |
| श्रीमती संगिता वाघुले | : मी श्री.पाटणी यांना दोन वेळेस पत्र दिले त्यांचे उत्तर मला दिले नाही फोन उचलत नाही. माझे वार्डातील कामे होत नाही कारण त्या ठेकेदारास पेमेन्ट केले जात नाही. |
| मा.सभापती | : याची दखल प्रशासनाने घ्यावी त्याना शोकास नोटीस देऊन कार्यवाही करावी. कोणकोणत्या ठेकेदाराची बिले देण्यात आली याची माहिती पुढील सभेत दयावी. |
| श्री.सिताराम सुरे | : जेटींग मशीन मिळत नाही. नवीन जेंटींग घेणार आहे परंतु 76 लक्ष बील दयायचे असल्याने त्या येत नाही. |
| मा.सभापती | : संबधीत अधिकारी यांचे काल मी चर्चा केली बील काढण्याचे सांगितलेले आहे लवकरच जेंटीग मशीन येतील. |
| श्री.सिताराम सुरे | : पिसादेवी रस्त्यावर ड्रेनेजचे पाणी वाहते आहे काही ठिकाणी पाणी तुडूंब भरलेले आहे तेथे काम करण्यास जेटींग मशीन मिळत नाही. |
| मा.सभापती | :सबंधीत अधिकारी यांना दालनात बोलवून कार्यवाही करण्याचे सुचना दिल्या जातील. |
| श्रीमती मनीषा मुंढे | : माझे वार्डात 70-80 लाईट रेल्वे पेटरीपासून बंद आहे.इतर भागातही लाईट बंद आहे.अधिकारी काम करण्याचे आश्वासन देतात काम करीत नाही. |
| मा.सभापती | : संबधीत अधिकारी यांनी दखल घ्यावी लाईट लावावे. |
| श्रीमती संगिता वाघुले | : वार्ड ब मध्ये 15-16 कर्मचारी काम करतात त्यांना 6 महिण्यापासून पेमेंन्ट दिले नाही. |
| मा.सभापती | : या कर्मचा-यांना तातडीने पेमेंन्ट करणे बाबत कार्यवाही करावी. |
| श्रीमती नरगीस शेख | : काल शुक्रवारी असूनही वार्डात पाणी आले नाही सातव्या दिवशी सुध्दा पाणी येत नाही. |
| मा.सभापती | : श्री.चहल येथे उपस्थित नाही. अतिरिक्त आयुक्त यांनी त्यांना आल्यावर आवश्यक त्या सुचना या संबधी दयावी. |
| श्रीमती किर्ती शिंदे | : ओला सुका कचरा वेगळा होत आहे परंतु जो मेडीसिन वजा असलेला कचरा त्यात मिक्स होत आहे तोही वेगळा करावा. |
| आरोग्य अधिकारी | : या कच-याची बायोमेडिकल वेस्ट प्रमाणे विल्हेवाट लावावी लागते ॲट सोर्स त्याचे सेग्रीकेशन केले तर ते जमा करता येईल पाटोदयाला त्यांचा प्लॅन्ट आहे.वार्ड मधील कचरा स्वतंत्र रित्या जमा करायला पाहिजे. |
| अति.आयुक्त | : तीन प्रकारचा कचरा जमा करतो त्यात ओला व सुका आणि घरगुती हाणीकारक असलेला कचरा वेगळा जमा करणेच्या सुचना दिल्या आहेत. |

**विषय क्र. 372 : (कार्य.अभि.-1)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.81 महाजन कॉलनी सिडको एन-2 येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा मैदानावर कचरा प्रक्रिया करण्यासाठी कॉंक्रीट प्लेट फॉर्म बसविणे तसेच रस्ता तयार करणे या कामाचे अंदाजपत्रक, सार्वजनिक बांधकाम विभाग सन 2015-16 च्या दरसुचीनुसार र.रू.34,29,138/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च सन 2017-18 च्या अर्थसंकल्पातील मा.महापौर यांनी सुचविलेले अत्यावश्यक कामे या लेखाशिर्षक मधुन करण्यात येईल.

करीता अंदाजपत्रक रक्कम रूपये 34,29,138/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 372, 373 मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.81 महाजन कॉलनी सिडको एन-2 येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रिडा मैदानावर कचरा प्रक्रिया करण्यासाठी कॉंक्रीट प्लेट फॉर्म बसविणे तसेच रस्ता तयार करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.34,29,138/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 373 : (कार्य.अभि.-2)**

विषय :पैठणरोडवरील मा.खासदार श्री.राजकुमारजी धुत यांच्या घरासमोरील आनंदविहार लिटिलवुड शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे या कामाचे ठेकेदार व्ही.टी.पाटील इंजिनियर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स यांचेकडून 0.05 टक्के अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.1,99,86,297/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र-AMCA-230840-2 सन 2017-2018

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता-2 महानगरपालिका औरंगाबाद |
| 2. | कामाचे स्वरुप | पैठण रोड वरील मा.खासदार श्री.राजकुमारजी धुत यांच्या घरासमोरील आनंदविहार लिटिलवुड शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | 1,99,87,295/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 1,99,87,295/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | ई-टेंडर विभाग महानगरपालिका औरंगाबाद |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 04/08/2017 ते 07/08/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 10/01/2018 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | एक |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1 | व्ही.टी. पाटील इंजिनियर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स | 1,99,86,297/- | 0.05% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | नवीन कॉंक्रीट रस्ते शहर |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | आहे. |
| | तरी विषयांकित प्रकरणी ठेकेदार व्ही.टी.पाटील इंजिनियर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स यांचेकडून 0.05% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.1,99,86,297/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पैठण रोड वरील मा.खासदार श्री.राजकुमारजी धुत यांच्या घरासमोरील आनंदविहार लिटिलवुड शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे या कामासाठी प्राप्त निविदाधारक ठेकेदार व्ही.टी.पाटील इंजिनियर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स यांचेकडून 0.05 टक्के अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.1,99,86,297/- पर्यंत काम करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 374 :**

विषय : शहर विकास योजने अंतर्गत काल्डा कॉर्नर ते दशमेशनगर शिवमंदिर पर्यंत 15.00 मी. रूंद रस्त्याचे व्हॉईट टॉपींग करणे या कामाचे ठेकेदार मे.व्ही.बी.ए. इन्फ्रा यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.12% कमी दराने म्हणजेच निविदा रक्कम रू.1,37,45,876/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : निविदा दि.06/01/2018

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | वार्ड अभियंता कार्यालय क्र.09 |
| 2. | कामाचे स्वरुप | रस्त्याचे व्हॉईट टॉपींग करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | 1,49,60,683/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 1,49,60,683/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 27 डिसेंबर 2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 06 जानेवारी 2018 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 05 |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1 | मे.व्हि.बी.ए. इन्फ्रा | 1,37,45,876/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.12% कमी दराने |
| 2 | मे.अमन कन्स्ट्रक्शन | 1,39,13,436/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.00% कमी दराने |
| 3 | मे.एस.डी.दौंडे कन्स्ट्रक्शन | 1,41,30,365/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5.55% कमी दराने |
| 4 | श्री.मोहमद अहेमद सिद्दीकी | 1,45,46,272/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.77% कमी दराने |
| 5 | श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग गुरूदत्ते | 1,51,10,141/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.00% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे. | --- |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | विकास योजना अंतर्गत रस्ते विकसीत करणे. |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | मा.स्थायी समिती सभा दि.16/10/2017 विषय क्र.1315 |
| | तरी विषयाकिंत काम ठेकेदार मे.व्ही.बी.ए. इन्फ्रा यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.12% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.1,37,45,876/-पर्यंत करून घेणेचा व करार करणेचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर. | |

मा.सभापती : ऐनवेळचे विषय क्र.374 मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहर विकास योजने अंतर्गत काल्डा कॉर्नर ते दशमेशनगर शिवमंदिर पर्यंत 15.00 मी. रूंद रस्त्याचे व्हॉईट टॉपींग करणे याकामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार मे.व्हि.बी.ए. इन्फ्रा यांचेकडून अंदाजपत्रकीय

दरापेक्षा 8.12% कमी दराने म्हणजेच निविदा रक्कम रू.1,37,45,876/- पर्यंत काम करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 375 :**

दि.11/01/2018 (का.प.क्र.16), 24/01/2018 (का.प.क्र.17),07/02/2018 (का.प.क्र.18), 01/03/2018(का.प.क्र.19),13/03/2018 (का.प.क्र.20),21/03/2018(का.प.क्र.21),26/03/2018 (का.प.क्र.22),28/03/2018(का.प.क्र.23),07/04/2018 (का.प.क्र.24),13/04/2018 (का.प.क्र.25) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणेस तसेच आज दि.21/04/2018 (का.प.क्र.26) रोजी संपन्न होत असलेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतास स्विकृतीसह मंजुरी देण्यांत येते.

मा.सभापती : स्थायी समिती सभांचे इतिवृत्त तयार करण्यासाठी स्टेनो कर्मचारी वेळेवर उपलब्ध न झाल्याने इतिवृत्त तयार करणे प्रलंबीत आहे. असे मागिल कार्यक्रम पत्रिका क्रमांक 16 ते 25 पर्यतचे इतिवृत्तसह आजच्या सभेचेही इतिवृत्त (का.प.क्र.26) स्विकृतीसह कायम करण्यात येते.

**ठराव :**

दि.11/01/2018 (का.प.क्र.16), 24/01/2018 (का.प.क्र.17),07/02/2018 (का.प.क्र.18), 01/03/2018(का.प.क्र.19),13/03/2018 (का.प.क्र.20),21/03/2018(का.प.क्र.21),26/03/2018 (का.प.क्र.22),28/03/2018(का.प.क्र.23),07/04/2018 (का.प.क्र.24),13/04/2018 (का.प.क्र.25) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणेस तसेच आज दि.21/04/2018 (का.प.क्र.26) रोजी संपन्न होत असलेल्या स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतास स्विकृतीसह मंजुरी देण्यांत आली.

चर्चा :

मा.सभापती : आर.सी.एच. अंतर्गत कर्मचाऱ्यांचे माझ्याकडे निवेदन आलेले आहे, त्यानुसार आर.सी.एच. फेज-2 अधिकारी व कर्मचारी यांना कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने मनपा आस्थापनेवर रिक्त असलेल्या जागेवर कायमस्वरूपी नेमणुक दिलेली आहे, त्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेनेही शासन निर्णयान्वये औरंगाबाद मनपातील मंजूर रिक्त पदांवर आर.सी.एच.-2 अंतर्गत करार तत्वावर कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचारी यांची रिक्त असलेल्या व मंजूर असलेल्या पदांवर नेमणुक करण्यांत यावी. यासाठी प्रशासनाने पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

आरंभ सोसायटी फॉर ऑटीझम स्लो लर्नर या संस्थेने अपंगाच्या शिक्षण व पुनर्वसनासाठी औरंगाबाद मनपाच्या हर्सुल येथील डे-केअर सेंटरच्या दोन रूम व बाजूची 15000 चौ.फुट जागेची मागणी रेडीरेकनर दरानुसार भाडेतत्वावर देण्याची मागणी केली आहे, त्यास मंजुरी देण्यांत येते.

श्री.साईनाथ एज्युकेशन सोसायटी शास्त्रीनगर, औरंगाबाद या संस्थेने शास्त्रीनगर, गारखेडा येथे असलेली मनपाची शाळा भाडेतत्वावर देण्याची विनंती केली आहे, त्याठिकाणी CBSE पॅटर्ननुसार विद्यार्थ्यांना शिकवणार असून, मनपा शाळेतील गरजु व गरीब विद्यार्थ्यांना ते शिकवणार आहे. त्यामुळे प्रशासनाने शाळा भाडेतत्वावर देण्याची कार्यवाही करावी, त्यास मंजुरी देण्यांत येते.

शहरात 100 कोटीच्या रस्त्याचे कामे त्वरीत हाती घ्यावी. या बाबत मा.मुख्यमंत्री महोदय यांनी ही सुचना केल्या आहे प्रशासनाने याची दखल घ्यावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद